## वेदांतासाठी महाविकास आघाडी सरकारने प्रयत्न केले नाहीत ; उद्योगमंत्री उदय सामंत



| वर्ष - 6 | अंक - 167 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!




www.mahaenews.com | ।सोमवार।दिनांक 26 सप्टेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# विमानतळ पुरंदरलाच!

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे संकेत : विमानतळासोबत कार्गो, लॉजिस्टिक पार्कचाही विचार

।पुणे।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्याच्या आर्थिक विकासात पुणे विमानतळाचे मोठे योगदान आहे. जगातील प्रमुख देश पुण्याशी जोडले गेले आहेत. पुणे येथून विमानाच्या फेऱ्या वाढविण्याची गरज आहे. सद्ध्याचे विमानतळ एका मर्यादेहून अधिक क्षमतेने चालणं शक्य नसल्याने पुण्यासाठी नवे विमानतळ तयार करणे आवश्यक आहे. पुरंदर येथे नवे विमानतळ उभारण्यासाठी प्रयत्न सुरू करण्यात आले आहे.**




> **देशाची अर्थव्यवस्था ५ ट्रिलीयन डॉलर एवढी करण्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वप्न असून ते साध्य करायचे असेल तर महाराष्ट्रालाही ट्रिलीअन डॉलर अर्थव्यवस्था व्हावी लागेल. राज्याच्या ट्रिलीयन डॉलर अर्थव्यवस्थेत मराठा चेंबर्स आणि पुण्यातील औद्योगिक परिसराची मोठी भूमिका राहील.**
> **- देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री.**

येथे विमानतळासोबत कार्गो आणि लॉजीस्टिक पार्क उभारण्याचाही विचार करण्यात येत आहे. नवी मुंबई विमानतळाला पुण्याशी जोडले जाईल, यामुळे पुण्याला त्याचा फायदा होईल, असे मत राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले.

मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्स्ट्रीज अँड अॅग्रीकल्चर पुणे संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते. यावेळी एमसीसीएआयचे माजी अध्यक्ष प्रतापराव पवार, मराठा चेंबर्सचे अध्यक्ष सुधीर मेहता, नियोजित अध्यक्ष दिपक करंदीकर, एमसीसीएआयचे महासंचालक प्रशांत गिरबाने आदी उपस्थित होते.

श्री.फडणवीस म्हणाले, एमएमआरडीए आणि पीएमआरडीए या दोन भागांत मोठा विकास अपेक्षित आहे. पुणे हे औद्योगिक उत्पादनाचे महत्त्वाचे केंद्र आहे. इथून मोठ्या प्रमाणात निर्यातही होते. पुण्याने नुकत्याच जाहीर झालेल्या ‘ग्लोबल स्टार्टअप इंडेक्स’ मध्ये ‘स्टार्टअप इकोसिस्टीम’च्या रुपात आपले महत्त्वाचे नाव प्राप्त केले आहे. आपल्याला यापेक्षाही अधिक प्रगती करायची आहे.

### रिंगरोड पुण्याच्या विकासाचे इंजिन ठरेल

पुण्यातील रिंगरोड पुण्याच्या पुढील १० वर्षाच्या विकासाला चालना देईल. रिंगरोडसाठी ३० हजार कोटींची गुंतवणूक अपेक्षित असून हा मार्ग येत्या १० वर्षात १ ते १० लाख कोटींचे मूल्य तयार करणारा ठरेल. हा रिंगरोड पुण्याच्या विकासाचे इंजिन ठरेल. या मार्गाच्या भूमी अधिग्रहणासाठी तज्ज्ञांकडून नाविन्यपूर्ण कल्पना आल्यास त्यांचे स्वागत केले जाईल. पुण्यात मेट्रो रेल्वेच्या दोन टप्प्याचे काम वेगाने पुढे जात आहे. पुण्यातील औद्योगिक वातावरण पाहता पुणे आणि पिंपरी चिंचवड शहर १०० टक्के विद्युत वाहनाचा किंवा पर्यायी इंधनाचा उपयोग करणारे पहिले शहर व्हावे.

# पिंपरीच्या सुरक्षेसाठी आमदार बनसोडे सरसावले !

## शांतता- सलोखा राखण्याचा प्रयत्न : धार्मिक संस्थांच्या ठिकाणी सीसीटीव्ही सुविधा

। पिंपरी चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी विधानसभा क्षेत्रात शैक्षणिक, सामाजिक, औद्योगिक, धार्मिक क्षेत्रात प्रगती व्हावी यासाठी आमदार अण्णा बनसोडे नेहमीच प्रयत्न करत असतात. शहराला प्रगती पथावर घेऊन जाताना शहरातील महत्वाच्या ठिकाणी सुरक्षितता असावी शहरात शांतता व सलोखा निर्माण व्हावा हा आमदार अण्णा बनसोडे यांचा प्रामाणिक हेतू असतो. त्याचाच एक भाग म्हणजे शैक्षणिक संस्था व धार्मिक संस्थेच्या ठिकाणी वॉल कंपाउंड बांधणे, बसविण्याचे काम ते करत असतात.**



त्याच उद्देशाने आज जामा मस्जिद फुगेवाडी येथे आमदार अण्णा बनसोडे यांच्या स्थानिक विकास निधीतून CCTV बसविण्याचे काम पूर्ण झाले. त्याचे उदघाटन कार्यसम्राट आमदार अण्णा बनसोडे यांच्याच हस्ते करण्यात आले. CCTV मुळे फुगेवाडी जामा मस्जिद च्या परिसरात सुरक्षित वातावरण निर्मिती होईल. त्यामुळे तिथे प्रार्थनेसाठी येणाऱ्या नागरिकांमध्ये तसेच मदरसामध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये विश्वासार्हता तयार होईल असा विश्वास जामा मस्जिद फुगेवाडी च्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

### मुस्लिम समाजाच्यावतीने आमदार बनसोडेंचे आभार

**मुस्लिम समाजातील कोणतीही अडचण आली तर सर्वात प्रथम आमदार अण्णा बनसोडे धावून येतात व प्राधान्याने त्या समस्यांचे निराकरण करतात. यासाठी संपूर्ण मुस्लिम समाजाचे वतीने आमदार अण्णा बनसोडे साहेबांचे आभार व्यक्त करतो अशी प्रतिक्रिया जामा मस्जिद चे अध्यक्ष बादशहा भाई शेख यांनी वक्त केली. आजच्या या CCTV उदघाटन प्रसंगी माजी नगरसेवक अबंरनाथ मेहमुदभाई सय्यद, श्रीमती संध्याताई गायकवाड, नगरसेविका स्वाती (माई) काटे, सामाजिक न्याय विभाग राष्ट्रवादी काँग्रेस पिंपरी चिंचवड शहरचे अध्यक्ष संजय औसरमल, सामाजिक कार्यकर्ते सतिश लांडगे, प्रा. मनोज वाखारे, लतिफ सय्यद, संजय गरूड, दीपक शिंदे, हरेश पुजारी यांच्या समवेत जामा मस्जिदचे पदाधिकारी त्यामध्ये अध्यक्ष बादशाहभाई शेख, सेक्रटरी इसाकभाई शेख, मुनाफ गुंदगी, कासीम शेख, महंमद शेख, यासीन सारवान, खलिल शेख उपास्थित होते.**

## शॉर्ट न्यूज

### ‘राजहंस’च्या दिलीप माजगावकर यांना राष्ट्रीय सुवर्ण पुरस्कार



।पुणे। महाईन्यूज ।

प्रकाशन व्यवसायात पन्नास वर्षांहून अधिक काळ कार्यरत असणारे राजहंस प्रकाशनचे दिलीप माजगावकर यांना ‘द फेडरेशन ऑफ पब्लिशर्स अँड बुकसेलर्स असोसिएशन इन इंडिया’ या संघटनेतर्फे सुवर्ण पुरस्कार जाहीर झाला आहे. दिल्ली येथे झालेल्या कार्यक्रमात राजहंस प्रकाशनच्या संचालिका रेखा माजगावकर यांनी हा पुरस्कार स्वीकारला. प्रकाशन क्षेत्रातील प्रदीर्घ आणि देदीप्यमान कार्याबद्दल हा पुरस्कार देण्यात येतो. माजगावकर यांच्या समर्थ नेतृत्वाखाली राजहंस प्रकाशन गेली ५५ वर्षे वाटचाल करीत आहे. या कालावधीत माजगावकर यांच्या कल्पनेतून आणि कर्तबगारीतून

# ‘पीएफआय’च्या कार्यकर्त्यांवर सामाजिक तेढ निर्माण केल्याचा गुन्हा !

## संघटनेवर बंदीचा निर्णय केंद्र शासन घेईल–देवेंद्र फडणवीस

।पुणे। महाईन्यूज ।

पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया (पीएफआय) या संघटनेच्या आंदोलकांवर पुणे पोलिसांनी प्राथमिक तपासानुसार रविवारी सामाजिक तेढ निर्माण केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान, सखोल चौकशी करून या संघटनेवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याबाबतच्या सूचना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुणे पोलिसांना केल्या आहेत. संघटनेवर बंदी घालण्याबाबतचा निर्णय केंद्र सरकार घेईल, अशी माहिती फडणवीस यांनी पुण्यात पत्रकारांशी बोलताना दिली. पाकिस्तान समर्थनार्थ दिलेल्या घोषणा कधीही मान्य होणार नाहीत. राज्यात



आणि देशात केलेली भारतविरोधी घोषणाबाजी खपवून घेतली जाणार नाही, असेही ते म्हणाले. पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडियाच्या (पीएफआय) कार्यकर्त्यांनी आंदोलनावेळी पाकिस्तान समर्थनार्थ घोषणाबाजी केल्याची चित्रफीत प्रसारित झाली होती. त्याचे तीव्र पडसाद शहरात उमटले आहेत. भारतीय जनता पक्षाने या संदर्भात पोलीस आयुक्त अमिताभ गुप्ता यांना निवेदन दिले, तर महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि युवा सेनेकडून त्या विरोधात रविवारी आंदोलने करण्यात आली. फडणवीस यांनीही याबाबत देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याबाबत पोलिसांशी चर्चा केली होती. पोलिसांच्या प्राथमिक तपासात आंदोलकांनी पाकिस्तान जिंदाबादच्या घोषणा दिल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुसार १५३ (अ), (दोन गटात व धर्मात तेढ निर्माण करणे), १५३ (ब), (देशाच्या अखंडतेवर प्रतिकूल प्रभाव टाकणारी बदनामीकारक वक्तव्ये), १०९ (गुन्हा करण्यासाठी प्रवृत्त करणे) आणि १२० (ब), (कट रचणे) अशी विविध कलमे या गुन्ह्यात अंतर्भूत करण्यात आली आहेत, अशी माहिती पोलीस उपायुक्त राहुल पाटील यांनी दिली.

पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया संघटनेच्या कार्यकर्त्यांना केंद्रीय आणि राज्यातील तपास यंत्रणेने गुरुवारी ताब्यात घेतले. त्याच्या निषेधार्थ पुण्यात शुक्रवारी पीएफआय संघटनेच्या समर्थकांनी आंदोलन केले होते. त्या वेळच्या प्रसारित झालेल्या चित्रफितीमध्ये आंदोलक विविध घोषणा देताना

**“देशविरोधी घोषणा खपवून घेतल्या जाणार नाहीत. काही वर्षे सातत्याने तपास करून, पुरावे जमा करून पीएफआयवर कारवाई करण्यात आली आहे. त्या संदर्भात देशातील विविध राज्यांनीही काही काम केले आहे. आपण यापूर्वीही राज्यात गृहमंत्री असताना त्यांच्या कृतीवर लक्ष ठेवत होतो. केरळ राज्याने तर पीएफआय संघटनेवर बंदी घालावी, अशी मागणी केली आहे. कारवाईवरून लक्ष विचलित करण्यासाठी कोणी काही करत असेल, तरी केंद्र आणि राज्य सरकार आणि तपासी यंत्रणा त्यांचे काम करील.**

**– देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री**

### चित्रफितीची न्यायवैद्यक प्रयोगशाळेकडून तपासणी

पीएफआयच्या आंदोलनाच्या अनुषंगाने गुन्ह्यांच्या कलमांमध्ये रविवारी वाढ करण्यात आली. आंदोलनानंतर पाकिस्तान जिंदाबादच्या घोषणा देणारी एक चित्रफीत प्रसारित झाली होती. त्याची सत्यता आता न्यायवैद्यक शाळेकडून करण्यात येणार असल्याची माहिती पुणे पोलिसांनी दिली.

# भीषणः ना रस्ता, ना रुग्णवाहिका!

## उपचारासाठी 55 वर्षीय महिलेचा सहा किलोमीटर झोळीतून प्रवास

।मावळ ।महाईन्यूज

पुणे जिल्ह्यातील आंदर मावळमध्ये ५५ वर्षीय आदिवासी महिलेला उपचारासाठी चक्क झोळीतून प्रवास करावा लागला आहे. आज ही मावळ परिसरात आदिवासी बांधव डोंगराच्या पाड्या, वस्त्यांवर वास्तव्यास आहेत. परंतु, मूलभूत सुविधांसह आरोग्य विषयक सुविधांपासून आदिवासी बांधव वंचित असल्याचं पुन्हा एकदा अधोरेखित झालं आहे. ५५ वर्षीय आजारी महिलेला डोंगरावरील सटवाईवाडी येथून पाच ते सहा किलोमीटर पायपीट करत मुख्य रस्त्यावर आणलं मग तिथून रुग्णालयात घेऊन जाण्यात आलं. भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष पूर्ण झाल्याने अवघ्या देशभरात अमृतमहोत्सव मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. पण, खऱ्या अर्थाने भारतातील कानाकोपऱ्यात आरोग्य सुविधा, रस्ते पोहचले आहेत का? असा प्रश्न पडतो. कारण, शिक्षणाच माहेर घर समजल्या जाणाऱ्या पुणे जिल्ह्यातील आंदर मावळ येथे एका ५५ वर्षीय आजारी आदिवासी महिलेला



**मावळ परिसरात आदिवासी बांधव डोंगराच्या पाड्या, वस्त्यांवर वास्तव्यास आहेत. परंतु, मूलभूत सुविधांसह आरोग्य विषयक सुविधांपासून आदिवासी बांधव वंचित असल्याचं पुन्हा एकदा अधोरेखित झालं आहे. ५५ वर्षीय आजारी महिलेला डोंगरावरील सटवाईवाडी येथून पाच ते सहा किलोमीटर पायपीट करत मुख्य रस्त्यावर आणलं मग तिथून रुग्णालयात घेऊन जाण्यात आलं. भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष पूर्ण झाल्याने अवघ्या देशभरात अमृतमहोत्सव मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. पण, खऱ्या अर्थाने भारतातील कानाकोपऱ्यात आरोग्य सुविधा, रस्ते पोहचले आहेत का? असा प्रश्न पडतो. कारण, शिक्षणाच माहेर घर समजल्या जाणाऱ्या पुणे जिल्ह्यातील आंदर मावळ येथे एका ५५ वर्षीय आजारी आदिवासी महिलेला झोळीतून प्रवास करावा लागला आहे.**

झोळीतून प्रवास करावा लागला आहे. आंदर मावळातील सटवाईवाडी ही वस्ती डोंगर माथ्यावर आहे. तिथं आरोग्य सुविधा आणि रस्त्यांच्या अभाव असल्याने आज ही आदिवासी बांधवांना मुख्य रस्त्यावर येण्यासाठी पाच ते सहा किलोमीटर ची पायपीट करावी लागते आहे. आजारी, वृद्ध व्यक्तींना झोळीतून प्रवास करावा लागतो आहे. नागमोडी वळण घेऊन ऊन, पावसाची तमा न बाळगता आदिवासी बांधवांना धावपळ करावी लागते आहे. अशीच अवस्था अनेक पाड्यावरील आणि वस्त्यावरील आहे. लोणावळा, मावळ, आंदर मावळ या ठिकाणी अनेक ठिकाणी रस्ते नसल्याने आदिवासी बांधवांना मूलभूत सुविधांसाठी झगडावं लागत आहे.

# बारामती आम्हीही जिंकू शकतो !

## रामदास आठवले यांचा विश्वास

।पुणे। महाईन्यूज ।



बारामती हा पवार कुटुंबीयांचा बालेकिल्ला असला तरी आमचाही किल्ला आहे. दलित आणि धनगर समाजाची चांगली मते आहेत. महादेव जानकर यांच्या विरोधात सुप्रिया सुळे कमी मताधिक्याने निवडून आल्या. त्यामुळे बारामतीही आम्ही जिंकू शकतो. असा विश्वास केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी रविवारी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केला. लोकसभेच्या ४५ जागा जिंकण्याचे लक्ष्य असून त्यामध्ये बारामतीच्या जागेचा समावेश आहे, असे त्यांनी सांगितले. मॉरिशस मराठी मंडळी संस्थेतर्फे मंगळवारी (२७ सप्टेंबर) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे अनावरण मॉरिशसचे राष्ट्रपती पृथ्वीराज सिंग यांच्या हस्ते होणार आहे. त्या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहे. भोर येथील फुले शाहू आंबेडकर विचार प्रसारक मंडळाने हा पुतळा तयार केला आहे. पुतळ्याचे अनावरण होणे ही आंबेडकरी समाजासाठी अभिमानाची गोष्ट आहे. असे आठवले यांनी या वेळी सांगितले.

आठवले म्हणाले, आरपीआयचा ६५ वा वर्धापनदिन ३ ऑक्टोबर रोजी भुसावळ येथे होणार असून या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, गिरीश महाजन, गुलाबराव पाटील उपस्थित राहणार आहेत. पक्ष व्यापक करण्यासाठीचा संकल्प या कार्यक्रमात करणार आहे. ११ डिसेंबर रोजी निलंगा येथे ओबीसी मेळावा होणार आहे. ओबीसींना स्थानिक स्वराज्य संस्थेत राजकीय आरक्षण मिळाले पाहिजे, ओबीसींची जातीनिहाय जनगणना झाली पाहिजे, अशी भूमिका आहे. जातीनिहाय जनगणनेमुळे जातिवाद वाढेल, ही भूमिका चुकीची आहे.

## भाजपा आमदार महेश लांडगे यांना मातृशोक

# उपमुख्यमंत्री फडणवीसांकडून लांडगे कुटुंबियांचे सांत्वन!

### अंत्यविधीवेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती

पिंपरी ।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांना मातृशोक झाला. हिराबाई किसनराव लांडगे (वय-६९) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर भोसरी गावातील वैकुंठ स्माशनभूमीमध्ये रविवारी सकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. दरम्यान, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लांडगे यांच्या निवासस्थानी सायंकाळी भेट दिली. तसेच, लांडगे कुटुंबियांचे सांत्वन केले.



यावेळी आमदार शिवेंद्रराजे भोसले, माधुरी मिसाळ, राहुल कुल यांच्यासह माजी मंत्री बाळा भेगडे, पुण्याचे माजी महापौर मुरलीधर मोहोळ, शहराध्यक्ष जगदीश मुळीक, गणेश बिडकर आदी उपस्थित होते.

गेल्या काही दिवसांपासून हिराबाई लांडगे संधीवात आजाराने त्रस्त होत्या. त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते.

जंतुसंसर्गामुळे प्रकृती चिंताजनक झाल्याने शनिवारी रात्री त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्यामागे पती किसनराव लांडगे, मुलगा आमदार महेश लांडगे, सचिन लांडगे, कार्तिक लांडगे तीन सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

#### विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून आदरांजली...

लांडगे कुटुंबियांची पिंपरी-चिंचवडसह पुणे जिल्ह्यात नाती-गोती आहेत. राजकीय, शैक्षणिक, सामाजिक तसेच क्रीडा क्षेत्रात गोतावळा असल्यामुळे आमदार लांडगे यांच्या मातोश्रींच्या अंत्यसंस्कारासाठी मोठा जनसमुदाय जमला होता.

यामध्ये खासदार श्रीरंग बारणे, माजी खासदार अमर साबळे, आमदार सुनील शेळके, राहुल कुल, उमा खापरे, माजी महापौर माई ढोरे, महापालिका आयुक्त शेखर सिंह, पोलीस आयुक्त अंकुश शिंदे, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे, शंकर जगताप, एकनाथ पवार यांच्यासह शहरातील सर्वपक्षीय नेते, माजी नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध सामाजिक संस्था, संघटनांचे प्रतिनिधी, हितचिंतकांनी हिराबाई लांडगे यांना आदरांजली वाहिली.

# स्व.अण्णासाहेबांनी स्वाभिमानाने जगायला शिकवले !

### कामगार नेते इरफान सय्यद : स्व. अण्णासाहेब पाटील यांना जयंतीदिनी अभिवादन

पिंपरी।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

स्व..आ.अण्णासाहेब पाटिल यांच्यामुळेच,कष्टकरी गोरग़रीब जनतेला, माथाड़ी कामगाराना स्वाभिमानाने, सन्मानाने जगता यावे यासाठी आपले आयुष्य वेचले व त्यांना न्याय मिळवून दिला. स्व.अण्णासाहेब पाटील यांनी लाखो कष्टकरी, मालवाहू माथाडी कामगारांना ताठ मानेने जगायला शिकवले, अशा भावना कामगार नेते इरफान शेख यांनी व्यक्त केल्या. कष्टकरी गोरग़रीब जनतेला स्वाभिमानाने जगता यावे यासाठी आपले आयुष्य वेचणाऱ्या आण्णासाहेब पाटील यांची आज, रविवार 89 वी जयंती साजरी करण्यात आली.



**चिंचवड येथील अण्णासाहेब पाटील यांच्या पुतळ्याला महाराष्ट्र मजदूर संघटनेच्या वतीने पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले.**

चिंचवड येथील अण्णासाहेब पाटील यांच्या पुतळ्याला महाराष्ट्र मजदूर संघटनेच्या वतीने पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी महा. राज्य कामगार सल्लागार समिती चे सदस्य तथा महाराष्ट्र मजदूर संघटनेचे संस्थापक /अध्यक्ष कामगार नेते इरफानभाई सय्यद, कार्याध्यक्ष परेश मोरे, सचिव प्रवीण जाधव, भिवाजी वाटेकर, खंडू मामा गवळी, पांडुरंग काळोखे, सर्जेराव कचरे, पांडुरंग कदम, सतीश कंठाळे, गोरक्षनाथ दुबाले, बबन काळे,मारुती कौदरे, संपत मांढरे, अशोक साळुंखे, ज्ञानेश्वर घनवट, गिरीश देशमुख,चंद्रकांत पिंगट, सोमनाथ फुगे, सोपान गाडगे, सतीश शिंदे, धुळा शेंडगे, रोशन दोलताडे, शंकर शिंदे, तानाजी कोळेकर, कैलास तोडकर, चंदन वाघमारे, रत्नाकर भोजने व असंख्य कामगार मोठ्या संख्यने उपस्थित होते.

## संपादकीय »

# साथ आणि संवाद

***'पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया' असे साळसूद नाव घेऊन देशविरोधी कारवाया करणाऱ्या कट्टर इस्लामी संघटनेवर देशव्यापी छापे पडावेत, त्याच दिवशी सरसंघचालक मोहन भागवत यांनी राजधानीत एका मशिदीत जाऊन इमामांशी आणि मुस्लिम नागरिकांशी चर्चा करावी आणि नेमक्या त्याच दिवशी 'पॉप्युलर फ्रंट'चे मोठे जाळे असणाऱ्या महाराष्ट्रात मुस्लिमांचा आर्थिक व सामाजिक स्तर उंचविण्यासाठी राज्य सरकारने अभ्यासगट स्थापन करावा, हा कुणालाही विलक्षण योगायोग वाटेल.***

तसा तो असला तरी या तीनही घटनांच्या मागे एक निश्चित सूत्र आहे. गरीब, अविकसित मुस्लिम समाजाला संवाद साधून सोबत घ्यायचे आणि त्याचवेळी, दहशती वृत्तीला नेस्तनाबूत करायचे, असे हे सूत्र आहे. ते विचारपूर्वक ठरलेले दिसते. भागवत यांनी मागे राजधानीत जी तीन व्याख्याने दिली; तेव्हापासून या प्रयत्नांना वेग आला आहे. गुरुवारी दिल्लीत कस्तुरबा गांधी मार्गावरील मशिदीत मोहन भागवत 'हिंदू आणि मुस्लिम यांचा डीएनए एकच आहे,' असे म्हणत होते; तेव्हा राष्ट्रीय तपास यंत्रणा म्हणजे एनआयए देशभरात व्यापक कारवाईत शंभराहून अधिक संशयितांना जेरबंद करीत होती. 'पीएफआय'वरील ही कारवाई इतकी मोठी आणि नियोजनपूर्वक झाली आहे की, या संघटनेची पाळेमुळे खणून काढण्याचा निर्धार त्यातून दिसतो. त्याचे स्वागत करायला हवे. अशी कारवाई म्हणजे त्या समाजाच्या विरोधातली कारवाई नसते. मात्र, यापूर्वी अनेकदा अशा संशयितांची धरपकड म्हणजे त्या समाजावरचा हल्ला, असे चित्र निर्माण केले गेले. त्यात अनेकांचा राजकीय स्वार्थही होता. भागवत यांनी साधलेल्या संवादाकडे या दृष्टीनेही पाहायला हवे. इतका विविधतेने नटलेला, अनेक पंथ अनुसरणारा आणि भारतीय संस्कृतीचे विविध आविष्कार दाखविणारा इस्लाम जगाच्या पाठीवर इतरत्र कुठेही नाही. मात्र, इस्लामला मोनोलिथ म्हणजे एकाश्म बनवून टोकेरी, कडवट, असहिष्णू करत नेणे, हाच कडव्या संघटनांचा उद्देश असतो. हिंदूंनाही हा धोका नाही, असे नाही. 'पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया' देशभर हेच करीत होती. कडव्या इस्लामचा पुरस्कार, नामानिराळे राहून हत्या घडवणे आणि दंगलसदृश वातावरण धगधगत ठेवणे, ही कामे फ्रंट करीत होती. पुढच्या काही दशकांत संपूर्ण भारत इस्लामी करण्याचे उद्दिष्ट फ्रंटने समोर ठेवले होते. हे होणे अशक्य आहे, हे सर्वांना माहीत असले तरी अशी वेडगळ ध्येये ठेवली की तरुणांच्या डोक्यात विखार आणि इंधन भरणे सोपे जाते. गेल्या काही महिन्यांमध्ये भारतात 'धर्मद्रोहाचा ठपका ठेवून' थंड डोक्याने ज्या हत्या झाल्या, त्यामागे ही 'मेंदूधुलाई'ची कार्यपद्धती होती. मेंदूचे एकदा असे प्रोग्रामिंग केले की दुसऱ्याला मारणे हे पुण्य वाटते आणि स्वत: त्यात मरणे, ही स्वगप्राप्तीची चावी वाटते.



## आनंदी सकाळ

# सगुण निर्गुणः रक्षण

जन्माला आलेला प्रत्येक जीव अथवा वस्तू यांचा नाश निश्चित आहे. कोणतीही गोष्ट त्याच्या टिकण्यावर अल्पायुषी व दीर्घायुषी ठरवता येते. परंतु आपण आपल्याला अनुकूल असलेल्या सर्व गोष्टी दीर्घायुषी व्हाव्यात, अशी अपेक्षा असते आणि त्यासाठी आपण आटोकाट प्रयत्न करतो. रक्षण हे केवळ जादा आयुष्य जगण्यासाठीच नव्हे तर चांगले जीवन जगण्यासाठीही करणे आवश्यक आहे. कारण किती जगला यापेक्षा कसे जगला हे फार महत्त्वाचे आहे. जगात काही गोष्टी स्वाभाविकरित्या नाश पावतात, तर काही पराक्रमण किंवा अपघाताने. स्वाभाविक नाशात प्रत्येक जीव, वस्तू त्यांचा काल संपल्यानंतर जिवंत राहू शकत नाहीत, अथवा टिकू शकत नाहीत. अपघात किंवा आक्रमणे पूर्वकल्पना देऊन होत नसतात. म्हणून स्वतः याबाबत काळजी घेऊन दीर्घकाळ टिकणे आणि टिकविणे म्हणजेच रक्षण.

# हिजाबची इराणी उठाठेव !






वस्त्र, मग ते नेसूचे असो की डोईवरचे, वापरावे की न वापरावे, वापरावे तर कसे वापरावे हा खरे तर पूर्णपणे ज्याचा त्याचा प्रश्न. वापरणाऱ्या व्यक्तीची गरज, सोय आणि (आजच्या काळात) तिचा फॅशनचा सोस यापलीकडे खरे तर या विषयाला महत्त्व देण्याचीही गरज नाही. पण जी वस्त्रप्रावरणे आपल्याला कधीही वापरावी लागत नाहीत अशा- स्त्रियांच्या – वस्त्रप्रावरणांना सतत हात घालण्याच्या पुरुषप्रधान मानसिकतेला 'आग लावण्या'चे काम सध्या इराणी स्त्रियांनी हातात घेतले आहे. राजसत्तेकडून होणारे दमन ही काही इराणी स्त्रियांसाठी नवी गोष्ट नाही. १९७९ मध्ये तिथे झालेल्या इस्लामी क्रांतीने तर समाजात मोकळेपणाने वावरणाऱ्या आधुनिक, इराणी स्त्रियांना थेट बुरख्यात नेऊन ठेवले होते. हिजाब न घातल्यामुळे अलीकडेच अटक झालेल्या आणि पोलीस कोठडीत मरण पावलेल्या महसा अमिनी या तरुणीच्या मृत्यूने त्यांची गेल्या ४० वर्षांमधली ही सगळी घुसमट जणू तेवढ्याच तीव्रतेने बाहेर पडते आहे. इराणच्या चौकाचौकांत उभे राहून हिजाब जाळण्याच्या त्यांच्या आंदोलनाला जगभरातून पाठिंबा मिळतो आहेच, पण खुद्द इराणमधील तरुण पुरुषदेखील त्यांच्या पाठीशी उभे राहताना दिसत आहेत. तिथले सत्ताधारी हे सगळे आंदोलन दडपण्याचा प्रयत्न करत असले तरी बदललेले तंत्रज्ञान आणि समाजमाध्यमे यामुळे ते दडपणे तितकेसे सोपे राहिलेले नाही.

१९७९ मध्ये झालेल्या इस्लामिक क्रांतीनंतर इराणमध्ये सर्वाधिक बंधने आली ती स्त्रियांवर. त्यांनी पेहराव काय करायचा, कसा करायचा, केस कसे झाकायचे, मेकअप किती करायचा, कपड्यांची लांबी, रुंदी कशी आणि किती असली पाहिजे हे सगळे राजसत्तेने निश्चित केले. स्त्रिया त्याच पद्धतीने वावरतात की नाही, हे पाहण्यासाठी 'गश्त ए इर्शाद' म्हणजेच नैतिक पोलीस नेमण्यात आले. संबंधित नियम न पाळणाऱ्या स्त्रियांना जाब विचारण्याचे अधिकार या पोलिसांना देण्यात आले. हे नियम मोडणाऱ्या स्त्रियांना त्यांच्या त्यांच्या गुन्ह्यांच्या स्वरूपानुसार दंड, तुरुंगवास किंवा फटक्यांची शिक्षा सुनावली जाऊ लागली. वरवर हे सगळे सुरू असले तरी समाजमनात त्या सगळ्या विरोधात धुम्मस होती. वेगवेगळ्या मार्गांनी, पद्धतींनी त्या विरोधात धुसफुस व्यक्त केली जात होती. पण हिजाब घातला नाही म्हणून पोलिसांनी अटक केलेल्या महसा अमिनी या २२ वर्षीय कुर्दिश तरुणीचा पोलीस कोठडीत नुकताच मृत्यू झाल्यानंतर इराणमध्ये सरकारी दडपशाहीविरोधात तीव्र आंदोलन सुरू झाले आहे. महसा अमिनीचा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्याने झाला असल्याचा यंत्रणांचा दावा असला तरी तिला झालेली अमानुष मारहाण, त्यात तिच्या मेंदूला दुखापत होऊन ती कोमात गेल्याचे पुरावे, तिथे उपस्थित असणाऱ्यांची विधाने वेगळ्याच गोष्टी सांगतात. सरकारी यंत्रणांनी सांस्कृतिक पोलिसगिरी करणे या गोष्टीला गेली काही वर्षे लहान लहान गटांमधून सुरू असलेल्या विरोधाला या प्रकरणामुळे बळ मिळाले आहे. स्त्रियांविरोधातील या शारीरिक, मानसिक अत्याचाराविरोधात आवाज उठवण्यासाठी रस्त्यावर उतरलेल्या ३१ इराणी नागरिकांना आपला जीव गमवावा लागला असल्याचे सांगितले जात आहे.

# राजकारण कोते, पण विद्यार्थी 'नीट'!

**तमिळनाडू सरकारने नीट या राष्ट्रीय पात्रता व प्रवेश परीक्षेला विरोध केलेला असतानाच, त्या राज्यातील विद्यार्थ्यांनी मात्र वेगळा सूर लावला आहे.**

गेल्या चार वर्षांतील आकडेवारी पाहता, तमिळनाडू राज्यातील विद्यार्थ्यांच्या नीट परीक्षेतील उत्तीर्णतेच्या प्रमाणात दुपटीने वाढ झालेली दिसते. २०१९ मध्ये हा निकाल १.८७ टक्के होता, तो २०२१ मध्ये ४.२५ टक्क्यांपर्यंत सुधारला. या वर्षी हा निकाल ३.४८ टक्के लागला आहे. कोणत्याही व्यावसायिक अभ्यासक्रमाचे प्रवेश जेव्हा राष्ट्रीय पातळीवर देण्याचे धोरण आखले जाते, तेव्हा देशभरातील विद्यार्थ्यांसाठी एकच सामाईक परीक्षा घेऊन प्रवेशासाठीचे निकष निश्चित करणे अधिक संयुक्तिक आणि सोयीचे असते. हाच निकष समोर ठेवून सर्वोच्च न्यायालयाने २०१७-१८ मध्ये देशपातळीवर एकच परीक्षा घेण्याबाबत निकाल दिला होता. तेव्हापासूनच या परीक्षेत सहभागी न होण्याबाबत तमिळनाडूमधील सरकार आग्रही राहिले आहे. प्रत्येक राज्यातील स्वायत्त परीक्षा मंडळांच्या निकालावर आधारित प्रवेश देताना, त्या त्या राज्यातील परीक्षा पद्धत आणि उत्तरपत्रिका तपासणीची पद्धत यातील तफावत टीकेचा विषय ठरली. त्यामुळे सामाईक परीक्षा घेऊन असे



प्रवेश देण्याचे धोरण आखण्यात आले. त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रवेश मिळण्यासाठी अधिक संधीही उपलब्ध झाल्या. नीट परीक्षेत ९५ पर्सेंटाइलहून अधिक गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांच्या संख्येत भरीव वाढ झालेली असतानाही, या परीक्षेमुळे राज्याच्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेशाच्या संधी आक्रसल्या जात असल्याचे मत व्यक्त करीत तमिळनाडू सरकारने या परीक्षेलाच विरोध केला आहे. या विरोधाला न जुमानता यंदाच्या वर्षी झालेल्या नीट परीक्षेसाठी त्या राज्यातील १ लाख ३२ हजार १६५ विद्यार्थ्यांनी अर्ज भरले. त्यातील ४६०० विद्यार्थ्यांना ९५ पर्सेंटाइलपेक्षा जास्त गुण मिळाले. महाराष्ट्रासारख्या शैक्षणिकदृष्ट्या प्रगत मानल्या जाणाऱ्या राज्यापेक्षाही तमिळनाडूचा निकाल अधिक आहे. महाराष्ट्रातील सर्वाधिक म्हणजे, २ लाख ४४ हजार ९०३ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. त्यापैकी ७ हजार ३७४ (३.०१ टक्के) विद्यार्थ्यांना सर्वाधिक गुण मिळाले. या वर्षी नीट परीक्षेत राजस्थानमधील विद्यार्थ्यांची टक्केवारी देशभरात सर्वात अधिक ठरली आहे. तेथे ११.२५ टक्के विद्यार्थ्यांना ९५ पर्सेंटाइलहून अधिक गुण मिळाले. सरकारी वैद्यकीय महाविद्यालयांत प्रवेश मिळणे, ही प्रत्येक इच्छुक विद्यार्थ्यांची मनीषा असते, कारण खासगी वैद्यकीय महाविद्यालयांचे शुल्क सहज परवडण्यासारखे नसते. हे शिक्षण गेल्या काही वर्षांत इतके महाग झाले आहे की, सामान्यांना तेथे प्रवेश घेणे दुष्कर बनले आहे. अशा स्थितीत केवळ गुणवत्तेवर प्रवेश मिळवणे, ही सर्वच विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची बाब ठरते. त्यामुळे तमिळनाडूमधील विद्यार्थी सरकारी धोरणाला न जुमानता अधिक संख्येने ही परीक्षा देतात. तमिळनाडूच्या सरकारने देशपातळीवर नव्याने लागू झालेल्या शैक्षणिक धोरणालाही विरोध केला आहे. हा विरोधही जुजबी किंवा प्रादेशिक अस्मितेपोटी केलेला असावा,

## ।। अभंगवाणी ।।



पराविया नारी माउलीसमान ।  
मानिलिया धन काय वेचे ॥१॥  
न करितां परनिंदा द्रव्य अभिलाष ।  
काय तुमचें यास वेचे सांगा ॥ध्रु.॥  
**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# "बुलेट ट्रेन पेक्षा 'वंदे भारत एक्स्प्रेस' अधिक वेगाने आणि स्वस्तात धावते आहे !"

## रोहित पवार यांनी ट्वीट करत बुलेट ट्रेनबाबत दिली माहिती!

**। मुंबई । महाईन्यूज ।**

**महाराष्ट्र-गुजरात दरम्यान ३० सप्टेंबरपासून तिसरी 'वंदे भारत एक्स्प्रेस' धावणार आहे. पंतप्रधान मोदी या ट्रेनला हिरवा झेंडा दाखवणार आहेत. स्वदेशी बनावटीची 'वंदे भारत एक्स्प्रेस' ही बुलेट ट्रेनलाही मागे टाकणार असल्याचे समोर आले आहे. काही दिवसांअगोदर करण्यात आलेल्या वेग मापन चाचणीत वंदे भारत एक्स्प्रेसने अवघ्या ५३ सेकंदामध्ये १०० किमी प्रतितास वेग गाठला, तर हाच वेग पकडण्यासाठी बुलेट ट्रेनला ५५ सेकंद लागतात, असे दिसून आले आहे. यावरून राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी ट्वीट करत बुलेट ट्रेनबाबत विधान केलं आहे.**



राज्यातील सत्तांतरानंतर केंद्र सरकार आणि राज्य सरकारने बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या कामांना वेग दिला आहे. बुलेट ट्रेन प्रकल्पाला मुंबईतील वांद्रे – कुर्ला संकुलातून सुरुवात होणार असून, ठाणे – शिळफाटादरम्यान २१ किलोमीटर लांबीचा भुयारी मार्ग उभारण्यात येणार आहे.

या मार्गासाठी निविदा प्रक्रिया राबविण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती, रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी शुक्रवारी दिली आहे. वांद्रे – कुर्ला संकुल येथे भूमीगत स्थानक –

दरम्यान, बुलेट ट्रेनचे वांद्रे – कुर्ला संकुल येथे भूमीगत स्थानक होणार आहे. त्याच्या उभारणीसाठी एक हजार ८०० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. हे स्थानक ४.९ हेक्टर जागेत उभारले जाणार असून १६ डब्यांच्या बुलेट ट्रेनसाठी सहा फलाट उभारण्यात येणार आहेत. प्रवासी सुविधांसह आकर्षक असे भूमिगत स्थानक असणार आहे.

त्यासाठीही निविदा प्रक्रिया आधीच सुरू करण्यात आली असून येत्या ऑक्टोबरमध्ये निविदा खुली होणार आहे. तसेच, बुलेट ट्रेनसाठी महाराष्ट्रात भूसंपादनाची प्रक्रिया धीम्या गतीने सुरू होती. राज्यात सत्तातरानंतर भूसंपादनालाही गती मिळाली आहे. या प्रकल्पासाठी राज्यातील ४३३.८२ हेक्टर जागा लागणार असून आतापर्यंत ४१४ हेक्टर म्हणजेच ९५ टक्के भूसंपादन पूर्ण झाले आहे.

तर नॅशनल हायस्पीड रेल्वे कॉर्पोरेशनला ५० टक्के जमिनीचा ताबा मिळाला आहे.

### रोहित पवार नेमकं काय म्हणाले?

तर, "बुलेट ट्रेन महाराष्ट्राच्या फायद्याची नव्हतीच शिवाय देशाच्या फायद्याचीदेखील नाही. बुलेट ट्रेनपेक्षा वंदेभारत ट्रेन अधिक वेगाने आणि स्वस्तात धावत असेल तर आत्मनिर्भर भारतात देशी बनावटीच्या कमी खर्चाच्या ट्रेनऐवजी जपानी बनावटीच्या अत्यंत खर्चिक असलेल्या बुलेट ट्रेनसाठी आग्रह का?" असा सवाल रोहित पवार यांनी ट्वीटद्वारे केला आहे. केंद्रीय रेल्वेमंत्री आश्विनी वैष्णव यांनी शेअर केलेल्या एक व्हिडीओत वंदे भारत एक्स्प्रेस १८० किलोमीटर प्रतितास इतक्या वेगाने धावत असताना पाण्याने भरलेल्या ग्लासातील एक थेंबही सांडला नसल्याचे दिसते. या व्हिडिओमध्ये वंदे भारत एक्स्प्रेसचा वेग एका मोबाइल फोनच्या स्क्रीनवरील स्पीडोमीटरवर नोंदला आहे.

---

# "रामदास कदम हे वेदान्त फॉक्सकॉन नाही पॉपकॉर्न..."

## भास्कर जाधवांनी उडवली खिल्ली

**।धुळे । ।महाईन्यूज ।**

वेदान्त समूहाच्या भागीदारीतून उभा राहणारा फॉक्सकॉन प्रकल्प गुजरातला होणार आहे. तेव्हापासून राज्यात राजकीय आरोप-प्रत्यारोप होत आहेत. त्यात आता महाराष्ट्राला मेडिसीन डिवाइस पार्क प्रकल्पही महाराष्ट्राबाहेर गेल्याचा आरोप शिवसेना नेते, आमदार आदित्य ठाकरेंनी केला आहे. त्यावरून आता भास्कर जाधव यांनी शिंदे-फडणवीस सरकारवर टीका केली आहे.



"महाराष्ट्रात २०१४ साली भाजपाचं सरकार आलं. तेव्हापासून आतापर्यंत महाराष्ट्रातील प्रकल्प गुजरातला गेले आहेत. गुजरातचा विकास होण्यासाठी कोणाचा विरोध नाही. मात्र, केंद्र सरकारचा महाराष्ट्रावर काय राग आहे, माहिती नाही. कारण महाराष्ट्रात येणारे प्रकल्प हे गुजरातला जात आहेत," असा निशाणा भास्कर जाधव यांनी भाजपावर साधला आहे.

"महाराष्ट्रात २०१४ साली भाजपाचं सरकार आलं. तेव्हापासून आतापर्यंत महाराष्ट्रातील प्रकल्प गुजरातला गेले आहेत. गुजरातचा विकास होण्यासाठी कोणाचा विरोध नाही. मात्र, केंद्र सरकारचा महाराष्ट्रावर काय राग आहे, माहिती नाही. कारण महाराष्ट्रात येणारे प्रकल्प हे गुजरातला जात आहेत," असा निशाणा भास्कर जाधव यांनी भाजपावर साधला आहे. आदित्य ठाकरे लोकांना वेदान्तबाबत खोट सांगत असल्याचा आरोप रामदास कदम यांनी केला होता. "रामदास कदम हे वेदान्त फॉक्सकॉन नाहीतर पॉपकॉर्न बोलतात. रामदास कदम यांची बुद्धिमत्ता काही दिवसांपूर्वी सांगितली आहे. लोक रामदास कदमांना जोकर म्हणून पाहतात, यापेक्षा आम्ही त्यांना फार महत्व देत नाही," असे प्रत्युत्तर भास्कर जाधव यांनी कदम यांना दिलं आहे.

दसरा मेळाव्यात सोनिया गांधी आणि शरद पवार यांचे विचार मांडणार का?, असा टोला मंत्री गुलाबराव पाटील यांनी शिवसेनेला लगावला आहे. "तुमच्या बॅनरवर भाजपाच्या लोकांची फोटो होते, आमच्या तर नाहीत ना. त्यामुळे गुलाबराव पाटील यांना दसरा मेळाव्यात उत्तर देऊ," असे भास्कर जाधव म्हणाले.

# फडणवीसांनी ६ जिल्ह्यांचं पालकमंत्रीपद घेतल्यावरून अजित पवारांचा खोचक टोला



**।मुंबई ।महाईन्यूज ।**

महाराष्ट्रात एकनाथ शिंदे-देवेंद्र फडणवीस सरकार स्थापन झाल्यापासून राज्यातील जिल्ह्यांना पालकमंत्री कधी मिळणार? हा प्रश्न विरोधकांकडून सातत्याने विचारला जात होता. अखेर शनिवारी पालकमंत्र्यांची घोषणा झाली आहे. शिदे-फडणवीस सरकारमधील विविध नेत्यांकडे पालकमंत्रीपदाची जबाबदारी देण्यात आली आहे.

पण देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पालकमंत्री म्हणून सहा जिल्ह्यांची जबाबदारी देण्यात आली आहे. यावरून विधानसभा विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी देवेंद्र फडणवीसांना टोला लगावला आहे. माझ्याकडे पुणे जिल्ह्याचं पालकमंत्रीपद होतं, तर माझ्या नाकीनऊ आलं होतं, ते सहा जिल्ह्यांचा कारभार कसा सांभाळणार आहेत? असा सवाल अजित पवारांनी विचारला आहे. ते बारामतीत बारामती सहकारी बँकेच्या ६१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बोलत होते.

## शॉर्ट न्यूज »

### सर्वोच्च न्यायालयातील सुनावणीचं आता होणार थेट प्रक्षेपण



।नवी दिल्ली।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।

न्यायव्यवस्थेत पारदर्शकता आणण्यासाठी न्यायपालिकेनं महत्त्वाचं पाऊल उचललं आहे. २७ सप्टेंबरपासून सर्वोच्च न्यायालयातील महत्त्वाच्या घटनापीठांपुढे होणाऱ्या सुनावणीचं थेट प्रक्षेपण करण्यात येणार आहे. २० सप्टेंबर रोजी सर्वोच्च न्यायालयाने याबाबतचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे येथून पुढे महत्त्वाच्या खटल्यांची सुनावणी देशभरातील नागरिकांनाही पाहायला मिळणार आहे. सर्वोच्च न्यायालयातील सुनावणीचं थेट प्रक्षेपण करण्यात यावं, याबाबत याचिका दाखल केल्यानंतर सुमारे चार वर्षांनी हा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयाचं अनेकांनी स्वागत केलं असलं तरी काहीजणांनी चिंता व्यक्त केली आहे.

# सचिन पायलट होणार नवे मुख्यमंत्री?

## राजस्थानमध्ये काँग्रेस आमदारांची बैठक



।तेहरान ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गेलहोत यांनी काँग्रेस अध्यपदासाठी निवडणूक लढणार असल्याचं स्पष्ट केलं आहे. त्यानंतर राजस्थानमधील राजकीय घडामोडींना वेग आला आहे. आज ( २५ सप्टेंबर ) राजस्थान काँग्रेसच्या आमदारांची बैठक बोलवण्यात आली आहे. या बैठकीत नवा मुख्यमंत्री कोण होणार, यावर चर्चा होण्याची शक्यता आहे.

काँग्रेसचे महासचिव आणि राजस्थानचे प्रभारी अजय माकन, ज्येष्ठ नेते मल्लिकार्जुन खर्गे यांच्या नेतृत्वाखाली आमदारांची बैठक होणार आहे. दरम्यान, शुक्रवारी अशोक गेहलोत यांनी म्हटलं की, "काँग्रेस अध्यपदासाठी ने निवडणूक लढणार आहेत. अध्यक्ष झाल्यानंतर कोण मुख्यमंत्री होणार? याचा निर्णय पक्ष घेईल." मात्र, गेहलोत यांच्यानंतर काँग्रेसचे नेते सचिन पायलट की अन्य कोण? मुख्यमंत्रीपदी होणार हे पाहावे लागणार आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी अजय माकन यांन काँग्रेसच्या हंगामी अध्यक्षा सोनिया गांधी यांची भेट घेतली होती. या भेटीत राजस्थानच्या राजकीय परिस्थितीवर भाष्य करण्यात आलं. तर, सचिन पायलट यांनी शुक्रवारी विधानसभा अध्यक्ष सी. पी. जोशी आणि काही आमदारांसोबत चर्चा केली. सचिन पायलटच मुख्यमंत्रीपदाचे प्रमुख दावेदार असल्याचं सांगण्यात येत आहे. तसेच, सी. पी. जोशी यांच्याही नावाची राजस्थानमध्ये चर्चा सुरू आहे.

### गेहलोत यांचा पायलट यांच्या नावाला विरोध

काँग्रेस अध्यक्षपदासाठी गांधी कुटुंबाची ७१ वर्षीय अशोक गेहलोत यांच्या नावाला पसंती आहे. पण, अशोक गेहलोत मुख्यमंत्रीपद सोडू इच्छित नाहीत. जर आपण मुख्यमंत्रीपद सोडलं तर त्यांचे प्रतिस्पर्धी सचिन पायलट मुख्यमंत्री होतील अशी त्यांना भीती आहे. २०२० मध्ये सचिन पायलट यांनी आपल्या समर्थक आमदारांसोबत बंड पुकारुन जवळपास सरकार पाडलं होतं.

# राजस्थानमध्ये राजकीय भूकंपाची शक्यता!

## काँग्रेसचे 80 आमदार देणार राजीनामा

।नवी दिल्ली।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।

राजस्थानमध्ये मुख्यमंत्री बदलाचे वारे वाहू लागले आहेत. राजस्थानचे विद्यमान मुख्यमंत्री अशोक गेहलोत काँग्रेसच्या अध्यक्षपदाच्या शर्यतीत उतरणार आहेत. त्यामुळे ते राजस्थानच्या मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. याच पार्श्वभूमीवर आज अशोक गेहलोत यांच्या निवासस्थानी राजस्थान काँग्रेस विधिमंडळ पक्षाची बैठक बोलावली आहे. अशोक गेहलोत यांच्यानंतर राजस्थानचा मुख्यमंत्री म्हणून सचिन पायलट यांच्या नावाची चर्चा आहे. यामुळे अशोक गेहलोत समर्थक आमदार नाराज झाले आहेत. मुख्यमंत्री गेहलोत यांच्या निवासस्थानी होणाऱ्या बैठकीला काँग्रेस अध्यक्षांनी काँग्रेस नेते मल्लिकार्जुन खरगे आणि अजय माकन यांना निरीक्षक आणि प्रभारी म्हणून पाठवलं आहे. मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांच्यासह दोन्ही निरीक्षक हॉटेलमधून मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी रवाना झाले आहेत. विधीमंडळ पक्षाची बैठक काही वेळात सुरू होऊ शकते. माजी उपमुख्यमंत्री सचिन पायलट यांच्यासह २५ आमदारही मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी उपस्थित आहेत. गेहलोत यांना पाठिंबा देणारे आमदार राजीनामा देऊ शकतात इंडियन एक्स्प्रेसला सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, गेहलोत गटाचे सर्व आमदार विधानसभा अध्यक्ष सीपी जोशी यांच्या घरी जाऊ शकतात. गेहलोत समर्थक आमदार सामूहिक राजीनामा देणार असल्याची चर्चा आहे. सुमारे ८० आमदारांनी त्यांचे राजीनामे लिहिले असून ते सर्व सभापतींच्या घरी नेण्यात येणार असल्याची माहिती मिळत आहे.याबाबत अधिक माहिती देताना काँग्रेस नेते प्रताप सिंग खाचरियावास यांनी 'एएनआय' वृत्तसंस्थेला सांगितलं की, सर्व आमदार संतापले असून ते राजीनामा देणार आहेत. आम्ही विधानसभा सभापतींच्या घरी जात आहोत. कोणतीही चर्चा न करता मुख्यमंत्री अशोक गेहलोत स्वत: निर्णय कसे काय घेऊ शकतात, यामुळे सर्व आमदार नाराज आहेत.

# ...अखेर अंकिताच्या पार्थिवावर एनएआयटी घाटावर अंत्यसंस्कार

## अंकिताच्या वडिलांनी गावकऱ्यांना समजूत घालत अंत्यसंस्कार करण्याची केली मागणी

।नवी दिल्ली ।
महाईन्यूज ।वृत्तसंस्था ।

गेल्या पाच दिवसांपासून बेपत्ता असलेल्या अंकिता भंडारी या तरुणीची नदी फेकून हत्या करण्यात आली. हत्येनंतर अंकिताचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला होता. त्यावेळी शवविच्छेदना फेरफार केल्याचा आरोप करत पुन्हा शवविच्छेदन करण्याची कुटुंबीय आणि गावकऱ्यांनी मागणी केली. परंतु, पोलिसांनी नकार दिल्याने आंदोलन करण्यात आले. मात्र, अखेर अंकिताच्या वडिलांनी गावकऱ्यांना समजूत घालत अंत्यसंस्कार करण्याची मागणी केली. त्यावेळी आंदोलकांनी माघार घेतली. त्यानंतर अखेर अंकिता भंडारीच्या पार्थिवावर एनएआयटी घाटावर अंत्यसंस्कार करण्यात आले.



अंत्यसंस्कारावेळी आंदोलकांनी 4 मागण्या केल्या. अंकिताचा अंतिम पोस्टमार्टम रिपोर्ट सार्वजनिक करावा. आरोपींना फाशी झालीच पाहिजे. अंकिताच्या कुटुंबाला 1 कोटी रुपये आणि कुटुंबातील एका सदस्याला नोकरी देण्यात यावी, अशा मागण्या त्यांनी केल्या.

दरम्यान, अंकिताच्या वडिलांनी सर्वांना आवाहन केल्याचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी सांगितले. त्याला धार्मिक विधी करायचे आहेत. सर्व कृती वेळेवर होत आहेत. अजिबात संकोच होणार नाही. सर्वांवर कडक कारवाई केली जाईल. एसआयटीने काम सुरू केले आहे.

आरोपी कोणीही असो, अशी घटना खपवून घेतली जाणार नाही. लवकरात लवकर कारवाई करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. फास्ट ट्रॅक असो की आरोपींना शिक्षा, आम्ही पूर्ण निर्धार आहोत. आम्हाला जी काही सरकारी मदत मिळेल, ती सरकार करेल.


अंकिता भंडारीच्या हत्येनंतर पोलिसांनी या हत्येची तपासणी करत अंकिताचा मृतदेह शोधण्यासाठी हे प्रकरण एसआडीआरएफला पाचारण केले. अंकिताचा मृतदेह सापडल्यानंतर शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला. त्यावेळी शवविच्छेदनात फेरफार केल्याचा आरोप अंकिताच्या भावानी केला असून, पुन्हा शवविच्छेदन करण्याची मागणी केली. मात्र, पोलिसांनी त्याला नकार दिला. त्यामुळे अंकिताच्या कुटुंबियांसह संपूर्ण गावकऱ्यांनी अंकिताचा मृतदेह अंत्यसंस्कारासाठी घेण्यास नकार दिला होता.

या हत्येप्रकरणी रिसॉर्टचा संचालक माजी राज्यमंत्र्याचा मुलगा याला पोलिसांनी अटक केली आहे. अंकिताचा मृतदेह शोधण्यासाठी पोलिसांनी एसआडीआरएफला पाचारण केले होते.या हत्याप्रकरणातील सर्व साक्षी पुरावे मिटवण्यात आल्याचा आरोप सोशल मीडियाद्वारे केला जात आहे. या आरोपात तथ्य नसल्याचा दावा अप्पर पोलीस अधिक्षक शेखर चंद्र सुयाल यांनी केला आहे. तसंच, याप्रकरणातील सर्व पुरावे पोलिसांकडे सुरक्षित असल्याचंही त्यांनी सांगितलं. पोलिसांकडे हे प्रकरण वर्ग करण्यात आल्यानंतर पोलिसांनी २२ सप्टेंबर रोजीच या हॉटेलचे व्हिडीओ काढले होते.

२३ सप्टेंबर रोजी सकाळीच फॉरेंसिक टीमने अंकिताच्या खोलीत आणि संपूर्ण रिसॉर्टमधील इलेक्ट्रॉनिक आणि वैज्ञानिक पुरावे जप्त केले होते. याप्रकरणी पोलिसांकडे पुरेसे पुरावे आहेत. ज्यामुळे आरोपींना कठोरातील कठोर शिक्षा होऊ शकते. याप्रकरणी आता पुढील तपास एसआयटी करत असल्याचीही माहिती पोलिसांनी दिली.

# गन्स अँड गुलाब'चा टीझर प्रदर्शित

अभिनेता राजकुमार राव हा वैविध्यपूर्ण भूमिका साकारत प्रेक्षकांच्या भेटीला येत असतो. त्याची प्रत्येक नवी भूमिका ही त्याच्या आधीच्या भूमिकेपेक्षा वेगळी असते. आता लवकरच तो नव्या भूमिकेत प्रेक्षकांना दिसणार आहे आणि तेही वेब सिरीजमधून. 'गन्स अँड गुलाब' असे या वेब सिरीजचे नाव आहे. नुकताच या सिरीजचा टीझर प्रदर्शित झाला. हा टीझर सोशल मिडीयावर भरपूर व्हायरल होत आहे. ही सिरीज म्हणजे एक डार्क कॉमेडी वेब सिरीज आहे. राजकुमारबरोबरच अभिनेता दुलकर सलमान देखील दिसणार आहे. नेटफ्लिक्सच्या या वेब सीरिजचा टीझर खूपच दमदार आहे. टीझरमध्ये, राजकुमार राव कोणावर तरी हल्ला करताना दिसत आहे, तर व्हॉईस-ओव्हर कोणाची काळी बाजू बाहेर येता कामा नये असे ऐकू येत आहे. या सिरीजचे दिग्दर्शन राज आणि डीके यांनी केले आहे. या टीझरमध्ये जुन्या हिंदी चित्रपटांचा भास होत आहे. या सिरीजमध्ये गुलशन देवय्या आणि आदर्श गौरव देखील महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत. टीझरमध्ये दुलकर सलमान आणि गौरवची झलकही पाहायला मिळत आहे. राजकुमार रावने हा टीझर सोशल मीडियावर शेअर केला आहे. त्याच्या या पोस्टवर चाहत्यांचा चांगला प्रतिसाद मिळत आहेत. कमेंट्स करत चाहते राजकुमारला शुभेच्छा देत आहेत.





## "आम्ही तुला गमावले..." लाडक्या श्वानाच्या निधनानंतर अजय देवगण भावूक

अभिनेता अजय देवगण सध्या त्याचा आगामी चित्रपट 'थँक गॉड'मुळे खूप चर्चेत आहे. हा चित्रपट वादाच्या भोवऱ्यात अडकला असतानाच अजय सिद्धार्थ मल्होत्रा आणि रकुल प्रीत सिंग यांच्याबरोबर 'थँक गॉड'च्या प्रदर्शनाची तयारी करत आहे. तो सोशल मीडियावरून चित्रपटाबद्दलचे अनेक अपडेट्स शेअर करत असतो. हा चित्रपट येत्या ऑक्टोबर रोजी रिलीज होत आहे. या दरम्यान, त्याच्या घरातील एका आदस्याचे निधन झाले आहे. ही बातमी अजयने सोशल मीडियावरून शेअर करत दुःख व्यक्त केलं आहे. अजयने त्याच्या पाळीव कुत्र्याचे निधन झाल्याचे सोशल मीडियावरून सांगितले. त्याने इन्स्टाग्रामवर एक स्टोरी शेअर केली आणि त्यात लिहिले, "काल माझा पाळीव कुत्रा कोकोला आम्ही गमावले. आम्ही सगळे खूप दुःखी आहोत. देव तुझ्या आत्म्याला शांती देवो. मला आणि साऱ्या कुटुंबालाच तुझी खूप आठवण येतेय आणि कायमच येत राहील." अजय देवगण हा प्राणी प्रेमी आहे. त्याने अनेकदा त्याचे आणि कोकोचे फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत.

## 'पेहला नशा' गाण्यावर प्रसिद्ध अभिनेत्रीचा रोमँटिक अंदाज

बॉलिवूडमध्ये नव्वदच्या दशकात अनेक अभिनेते अभिनेत्री उदयास आले, बच्चनजींच्या 'अँग्री यंग' मॅनची क्रेझ कमी व्हायला लागली होती. आमिर खान, शाहरुख खान, सलमान खानसारखे रोमँटिक अभिनेते चित्रपट गाजवत होते. तर दुसरीकडे अक्षय कुमार, सुनील शेट्टी, अजय देवगण हे ॲक्शन हिरो म्हणून प्रसिद्ध झाले. अभिनेत्रींनमध्ये माधुरी दीक्षित आपल्या नृत्याने, अभिनयाने प्रेक्षकांची मन जिंकत होती. मनीषा, करिष्मा, रविना यासारख्या अभिनेत्री आपले स्थान निर्माण करत होत्या. यांच्यातच भर पडली ती एका गोड अभिनेत्रीची ती म्हणजे 'आयेशा जुल्का' या अभिनेत्रीची.

आयेशाचा सर्वात लक्षात राहणारा चित्रपट म्हणजे 'जो जिता वही सिकंदर', आमिर खानची प्रेयसीची भूमिका तिने या चित्रपटात केली होती. तरुणाई, कॉलेज विश्व, स्पर्धा अशा गोष्टी या चित्रपटात दाखवण्यात आल्या होत्या. तरुणाईने या चित्रपटाला डोक्यावर घेतले. चित्रपटाचे कथानक जमून आले होते मात्र यातील गाणी आजही रसिकांच्या लक्षात आहेत. पेहला नशा या गाण्याची क्रेझ आजही आहे. पहिल्या प्रेमाबद्दलचे गाणे आजही अनेकजण गुणगुणत असतात. अभिनेत्री आयेशा जुल्काने या गाण्याच्या आठवणींना उजाळा दिला आहे. आपल्या इन्स्टग्राम अकाऊंटवर तिने गाण्यावर डान्स केलेला व्हिडिओ शेअर केला आहे. नेटकऱ्यांनीदेखील या व्हिडिओला आपली पसंती दर्शवली आहे.१९९२ साली 'जो जीत वही सिकंदर' हा चित्रपट प्रदर्शित झाला होता. या चित्रपटात आमिर बरोबर पूजा बेदी, दीपक तिजोरी, कुलभूषण खरबंदासारखे कलाकार होते. मन्सूर खान यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले होते. जतीन ललित यांनी चित्रपटाला संगीत दिले होते. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर हिट ठरला होता. आमिरच्या कामाचे कौतुकदेखील झाले होते. अभिनेत्री आयेशा जुल्काची नुकतीच 'हश हश' या वेबसिरीजमध्ये दिसली आहे. यामध्ये तिच्याबरोबर जुही चावला, सोहा अली खान दिसत आहेत. ही वेबसिरीज सस्पेन्स थ्रिलर आहे. तनुजा चंद्रा, कोपल नैथानी, आशिष पांडे यांनी वेबसिरीज दिग्दर्शित केली आहे. या वेबसिरीजमुळे अभिनेत्री आयेशा जुल्का पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. २०१८ साली आलेल्या 'जिनियस' चित्रपटात ती दिसली होती



## सनी लिओनीच्या घरात काटेकोरपणे पाळला जातो 'हा' नियम!

सनी लिओनी ही सध्या बॉलिवूडचा एक अतूट भाग झाली आहे. पॉर्न इंडस्ट्रीमधून बॉलिवूडमध्ये काम करायला आलेली सनीला प्रेसक्षकांनीही लगेच स्वीकारलं. काही चित्रपटात आयटम नंबर तर काही चित्रपटात छोटीशी भूमिका करत तिने स्वतःचा चांगलाच जम इथे बसवला आहे. इतकंच नाही तर कित्येक रीयालिटि शोमध्येही ती आपल्याला दिसते.सनी तिच्या हॉट, ग्लॅमरस आणि मादक अदांसाठी चांगलीच चर्चेत असते. सनीचा भूतकाळ जरी मागे राहिला असला तरी अजूनही बरीच लोकं तिला त्याच दृष्टिकोनातून बघतात आणि सोशल मीडियावर तिला ट्रोल करत असतात. याच कारणामुळे आणि मुलांच्या भवितव्यासाठी तिने तिच्या घरात 'नो सोशल मीडिया' हा दंडक घातला आहे. याविषयीच हिंदुस्तान टाईम्सला दिलेल्या एका मुलाखतीमध्ये सनीने खुलासा केला आहे. सनी म्हणते, "आमची तिनही मुलं सध्या बरीच लहान आहेत. त्यांना चांगलं काय वाईट काय याची जाणीव नाही. त्यांनी आत्ता त्यांचं बालपण अनुभवायला हवं. जगात काय चाललंय किंवा त्यांच्या आई वडिलांबद्दल कोण काय बोलतंय याच्याशी त्यांचा काहीही संबंध नाही. आम्ही घरात असताना एकमेकांशी सगळं शेअर करतो. आम्ही जेव्हा घरी असतो तेव्हा सोशल मीडिया बघायचं कटाक्षाने टाळतो. सोशल मीडियावर आमच्याविषयी बरंच नकारात्मक बोललं जातं, लिहिलं जातं पण आम्ही त्याकडे दुर्लक्ष करतो." सनी ही तिच्या बोल्ड अंदाजाप्रमाणे बेधडक स्वभावासाठीही ओळखली जाते.



## शॉर्ट न्यूज »

### दिप्ती शर्माने दाखवलेल्या हुशारीला कॅप्टनचा पाठिंबा



**। मुंबई । महाईन्यूज**

भारत-विरुद्ध इंग्लंड यांच्यातील तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात भारताची गोलंदाज दिप्ती शर्माने इंग्लंडच्या फलंदाजाला अनोख्या पद्धतीने धावबाद केल्यामुळे वेगवेगळ्या चर्चा रंगल्या आहेत. दिप्तीने इंग्लंडची फलदाज शार्लोट डीनला धावबाद करून भारताला विजय मिळवून दिला. मात्र दिप्तीने धावबाद करण्यासाठी वापरलेली पद्धत म्हणजे मंकडिंग असून हे खेळभावनेविरोधी कृती असल्याचे मत काहींनी व्यक्त केले आहे. तर काहींनी दिप्तीला थेट पाठिंबा दिला असून तिने नियमांना धरूनच शार्लोट डीनला बाद केले, अशी भूमिका काहींनी घेतली आहे. भारतीय महिला क्रिकेट संघाची कर्णधार हरमनप्रित कौरने या सर्व वादावर प्रतिक्रिया दिली आहे. तिने दिप्तीला पाठिंबा दिला आहे. हा खेळाचा एक भाग आहे. आम्ही वेगळे काही केले आहे, असे मला वाटत नाही. हा क्रिकेटमधील एक नियम आहे. दिप्तीने ज्या पद्धतीने इंग्लंडच्या खेळाडूला बाद केले.

# याला म्हणतात टीम इंडिया!

## रोहितने मारली कोहलीला मिठी

**।हैदराबाद । महाईन्यूज ।**

विराट कोहली आणि रोहित शर्मा यांच्यामध्ये विस्तवही जात नाही, असे म्हटले जात होते. पण ही गोष्ट किती खोटी आहे हे आजच्या सामन्यात पाहायला मिळाला. सामना संपला तेव्हा एक मोठी गोष्ट घडली. रोहितने यावेळी चक्क कोहलीला मिठी मारल्याचे पाहायला मिळाले. या गोष्टीचा व्हिडिओ सध्याच्या घडीला चांगलाच व्हायरल झाला आहे. भारताने तिसऱ्या सामन्यात दमदार विजय साकारला. या विजयानंतर एक आश्चर्यकार गोष्ट पाहायला मिळाली. रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्यामध्ये विस्तवही जात नाही, असे म्हटले जात होते. पण आज सामना संपल्यावर रोहितने चक्क विराटला मिठी मारल्याचे पाहायला मिळाले. या गोष्टीचा व्हिडिओ आता क्रिकेट विश्वात जोरदार व्हायरल होत आहे.

सामना संपण्याच्या काही काळ आधी ही गोष्ट मैदानात पाहायला मिळाली. कोहलीने यावेळी ६३ धावांची खेळी साकारली आणि तो बाद झाला. कोहलीला यावेळी अखेरपर्यंत क्रीझवर राहून संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब करता आले नाही. कोहली बाद झाला आणि त्यानंतर तो पेव्हेलियनच्या दिशेने जायला लागला. जेव्हा कोगली पेव्हेलियनमध्ये जायला लागला तेव्हा रोहित खास कोहलीला भेटायला आला. रोहितने यावेळी कोहलीच्या पाठीवर थाप मारली. पण त्यानंतर विराट रोहतबरोबर शिडीवरच बसला. कारण या दोघांनाही भारताचा विजयी क्षण पाहायचा होता. हार्दिक पंड्याने चौकार मारला आणि भारताने विजयासग मालिका जिंकली. हा आनंद विराट आणि रोहित या दोघांनी एकत्रितपणे लुटला. या विजयानंतर दोघेही शिड्यांवरून उठले आणि त्यांनी विजय साजरा केला. यावेळी रोहितने कोहलीला मिठी मारल्याचे पाहायला मिळाले.

### कोहलीने अहंकार बाजूला ठेवला आणि विजय मिळाला



सामना संपल्यावर कोहलीने एक खुलासा केला. कोहली म्हणाला की, " रोहित बाद झाल्यावर जेव्हा सूर्या फलंदाजील आला. सूर्या जेव्हा फलंदाजीला आला तेव्हा तो चांगलाच सेट वाटत होता. सुरुवातीपासूनच तो मोठे फटके लगावत होता. त्यावेळी आमच्यासाठी धावा महत्वाच्या होत्या. त्यामुळे मी जास्त स्ट्राइक घेण्याचा प्रयत्न केला नाही. त्यावेळी सूर्याला संधी देणे गरजेचे होते. त्यामुळे मी त्याला जास्त संधी देण्याची तयारी दाखवली. कारण तो चांगले आणि मोठे फटके मारत होता." यानंतर जेव्हा समालोचक चर्चा करत होते, तेव्हा त्यांनी कोहलीने आपला इगो बाजूला ठेवत संघाच्या विजयासाठी मोठे पाऊल उचलले, असेही त्यांनी सांगितले. त्यामुळे आपल्यापेक्षा संघ हा मोठा असतो, हे कोहलीने यावेळी पुन्हा एकदा दाखवून दिले आहे.

# आगामी विश्वचषकासाठी माहीचा जबरदस्त प्लॅन

## 2011च्या विश्वचषकाची पुनरावृत्ती होणार

**। लंडन । महाईन्यूज ।**



भारतीय संघातील सर्वात यशस्वी कर्णधारांपैकी एक महेंद्रसिंग धोनीने शनिवारी सोशल माध्यमांवर एका पोस्टद्वारे सांगितले होते की, तो आज म्हणजेच रविवारी एक मोठी घोषणा करणार आहे. धोनीने चेन्नई सुपर किंग्जमधून निवृत्तीची घोषणा करणार असल्याचे सोशल माध्यमांवरील चाहत्यांच्या वक्तव्यानंतर अफवा पसरल्या होत्या, पण धोनीच्या लाइव्ह आल्यानंतर ही अफवा खोटी ठरली आहे. कारण धोनीने असा कोणताही निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे चाहत्यांनी सुटकेचा निश्वास सोडला.

रविवारी दुपारी दोन वाजता थेट लाइव्ह येणार असल्याचे त्यांनी सांगितले होते. माजी कर्णधार लाइव्ह आणि त्याच्या चाहत्यांच्या संख्येवरून तुम्ही अंदाज लावू शकता की जेव्हा धोनी लाइव्ह आला तेव्हा लाखो लोक त्याला फेसबुकवर पाहत होते. बिस्किट कंपनी ओरियाच्या भारतातल्या पहिल्या लॉन्चसाठी धोनी आला होता. याआधी धोनी आणि त्याची मुलगी झिवा यांनीही या कंपनीच्या जाहिराती केल्या आहेत. त्याच्या बाबतीत सांगायचे झाल्यास एमएस धोनी १५ ऑगस्ट २०२० रोजी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त झाला, तरीही तो अजूनही फ्रँचायझी क्रिकेट खेळत आहे आणि आयपीएलच्या सर्वात यशस्वी संघांपैकी एक चेन्नई सुपर किंग्सचा कर्णधार आहे. धोनी म्हणतो की, हे बिस्किट २०११ मध्ये भारतात आले तेव्हा टीम इंडियाने विश्वचषक जिंकला. आता पुन्हा एकदा ओरियो भारतात लॉंच होत आहे, त्यामुळे या वेळेचा टी२० विश्वचषकही आपणच जिंकणार आहे. धोनीने केसांची रचना तशीच ठेवली आहे, तो विनोद असला तरी धोनीने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली तेव्हा कोणतीही पत्रकार परिषद घेतली नव्हती.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही